असा. क्र. ३६ रजिस्टर्ड नं. एमएच/एसबीआय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, एप्रिल २५, १९९७/वैशाख ५, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**—मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३ च्या तरतुदीनुसार नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे यासाठी तरतूद करण्याकरिता भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करण्यासाठी आणि विवक्षित विधिग्राह्यकारी तरतुदी करण्याकरिता अधिनियम. ३५१—३५४

दिनांक २५ एप्रिल १९९७ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २५ एप्रिल १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३ च्या तरतुदींनुसार नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे यासाठी तरतूद करण्याकरिता भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करण्यासाठी आणि विवक्षित विधिग्राह्यकारी तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

१९९६ चा महा. अध्या. १७. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) (नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे याची तरतूद करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करणे आणि विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, १९९६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अध्यादेश" असा करण्यात आला आहे) हा दिनांक १० ऑक्टोबर १९९६ रोजी प्रख्यापित केला;

**आणि ज्याअर्थी,** ९ डिसेंबर १९९६ रोजी राज्य विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन बोलावण्यात आले होते आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) (नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे याची तरतूद करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करणे आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, १९९६ (१९९६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८) हे, दिनांक ९ डिसेंबर १९९६ रोजी विधानसभेत मांडण्यात आले होते. परंतु दिनांक २० डिसेंबर १९९६ रोजी संपलेल्या उक्त अधिवेशनात ते मंजूर होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश हा, राज्य विधानमंडळाच्या पुन्हा भरलेल्या अधिवेशनाच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी ज्या तारखेस संपतो त्या दिनांक १९ जानेवारी १९९७ नंतर चालू असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** कायद्याद्वारे उक्त अध्यादेशाच्या तरतुदींचे प्रवर्तन चालू राहण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे आवश्यक होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदींचे प्रवर्तन चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून त्यांनी दिनांक १७ जानेवारी १९९७ रोजी, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) (नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे याची तरतूद करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करणे आणि विधिग्राह्यीकरण आणि चालू ठेवणे) अध्यादेश, १९९७ हा प्रख्यापित केला आहे ; १९९७ चा महा. अध्या. १

**आणि ज्याअर्थी,** मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) (नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे याची तरतूद करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करणे आणि विधिग्राह्यीकरण आणि चालू ठेवणे) अध्यादेश, १९९७ याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** आता भारतीय गण-राज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९९७ चा महा. अध्या. १

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) (नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे याची तरतूद करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करणे आणि विधिग्राह्यीकरण आणि चालू ठेवणे) अधिनियम, १९९७ असे म्हणावे.

(२) तो दिनांक १० ऑक्टोबर १९९६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

नोंदणी फी व बाजार फी बसविण्यासाठी व वसूल करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उप-विधी अधिनियमित करणे. २. दिनांक १ फेब्रुवारी १९८८ ला प्रारंभ होणाऱ्या आणि दिनांक २३ एप्रिल १९९५ ला संपणाऱ्या मुदतीमध्ये, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, नवी मुंबई (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त बाजार समिती " असा करण्यात आला आहे) हिच्या क्षेत्रामध्ये बाजार तळावर नोंदणी फी, आणि तरतूद करण्यात आलेल्या किंवा व्यवस्था करण्यात आलेल्या सामायिक सेवा, सुविधा आणि सोयी यांसाठी बाजार फी बसविण्याची व ती वसूल करण्याची तरतूद करण्यासाठी करण्यात आलेले पुढील उप-विधी हे, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३ याच्या कलम ६९ व कलम ५ चे पोट-कलम (३) व कलम ३४ अन्वये, उक्त बाजार समितीकडून दिनांक १ फेब्रुवारी १९८८ रोजी यथोचितरीत्या व वैध-रीत्या करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— १९८३ चा महा. ४२.

"१. **नाव, प्रारंभ आणि प्रयुक्ती.**—(१) या उप-विधीस, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, नवी मुंबई (नोंदणी फी व बाजार फी बसविणे व वसूल करणे) उप-विधी, १९८८ असे म्हणावे.

(२) ते दिनांक १ फेब्रुवारी १९८८ रोजी अंमलात येतील.

(३) ते दिनांक १ फेब्रुवारी १९८८ रोजी प्रारंभ होणाऱ्या आणि दिनांक २३ एप्रिल १९९५ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी, नोंदणी फी व बाजार फी बसविण्याच्या आणि वसूल करण्याच्या संबंधात लागू होतील.

२. **व्याख्या.**—या उपविधींमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(अ) "अधिनियम" म्हणजे, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३ ;

(ब) "बाजार समिती" म्हणजे, या अधिनियमाच्या कलम ४ अन्वये स्थापन केलेली मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, नवी मुंबई.

३. **नोंदणी फी.**—(१) बाजार समितीकडे नोंदणी होण्याकरिता करावयाचा अर्ज हा, बाजार क्षेत्रात विनिर्दिष्ट व्यापारात कायदेशीररीत्या गुंतलेल्या व्यापाऱ्याकडून बाजार समितीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे करण्यात येईल ;

(२) अशा नोंदणीकरिता प्रत्येक अर्जामागे, दिनांक ३१ डिसेंबर १९९० पर्यंत रु. १०० या दराने आणि त्यानंतर रु. २०० या दराने नोंदणी फी बसवण्यात येईल.

४. **बाजार फी बसवणे व वसूल करणे.**—(१) लोखंड व पोलाद यांचा विनिर्दिष्ट व्यापार करणाऱ्या आणि बाजार तळामध्ये एकतर पट्टेदार म्हणून किंवा अन्य प्रकारे कोणतीही जागा धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून, बाजार समितीने तरतूद केलेल्या सामाईक सेवा, सुविधा व सोयींबद्दल, भूखंडाच्या, दुकानाच्या, कार्यालयीन जागेच्या, गोदामाच्या किंवा खुल्या जागेच्या क्षेत्रफळानुसार, दरसाल खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, फी बसवण्यात व वसूल करण्यात येईल.

**तक्ता**

| अनुक्रमांक | क्षेत्र | बाजार फी दर चौरस मीटरमागे |
|---|---|---|
| | | रुपये |
| १. | ५,००० चौरस मीटरपर्यंत .. .. .. | ९.०० |
| २. | ५,००१ व १,००,००० चौरस मीटर .. .. | ७.५० |
| ३. | १,००,००१ चौरस मीटर व त्यापेक्षा अधिक .. .. | ६.०० |

(२) बसवण्यात व मागणी करण्यात आलेली बाजार फी, असे प्रदान करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत भरण्यात आली नाही तर बाजार समितीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला तो ठरवील असे विलंबित प्रदान आकारदेखील आकारता येतील.".

१९८३ चा महा. ४२. ३. मुंबई महानगर विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन), १९८३ यामध्ये किंवा कोणत्याही बाजार न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, समितीने उक्त अधिनियमाच्या तरतुदीअन्वये कृती करणाऱ्या किंवा कृती करणे अभिप्रेत असलेल्या उक्त बाजार बसविलेल्या समितीने, दिनांक १ फेब्रुवारी १९८८ रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक २३ एप्रिल १९९५ रोजी आणि वसूल समाप्त होणाऱ्या कालावधीमध्ये, अशा फी बसवण्याच्या व वसूल करण्याच्या अनुषंगाने केलेल्या फीचे (केलेली कोणतीही कृती किंवा गोष्ट यांसह) बसवलेली आणि वसूल केलेली कोणतीही नोंदणी फी विधिग्राह्य- किंवा बाजार फी ही, जेथवर ती या अधिनियमाच्या कलम २ अन्वये करण्यात आलेल्या उपविधींच्या करण. उपविधी (३) व (४) च्या अनुसार असेल तेथवर, उक्त उपविधी (३) व (४) हे सर्व संबंधित वेळी जणूकाही सतत अंमलात होते अशाप्रकारे, वैध रीतीने बसवण्यात आल्याचे व कायद्यानुसार वसूल केलेली असल्याचे मानण्यात येईल आणि ती नेहमीच अशाप्रकारे बसविण्यात व वसूल करण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि त्याप्रमाणे,—

(अ) अशी फी बसवणे व वसूल करणे या संबंधात उक्त बाजार समितीने किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी अथवा कर्मचाऱ्यांनी केलेल्या सर्व कृती, कार्यवाही किंवा गोष्टी, या

सर्व प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार केलेल्या असल्याचे मानण्यात येईल आणि त्या नेहमीच अशा प्रकारे करण्यात आलेल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) उक्त बाजार समितीविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध, अशा रीतीने बसविलेल्या आणि वसूल केलेल्या नोंदणी फीच्या किंवा बाजार फीच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कोणतीही कार्यवाही चालवता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही ;

(क) कोणतेही न्यायालय किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण, कोणतीही नोंदणी फी किंवा बाजार फी परत करण्याचे निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश जारी करणार नाही.

सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन.

४. (१) मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू (स्थान नियमन) (नोंदणी फी आणि बाजार फी बसविणे आणि वसूल करणे याची तरतूद करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने उपविधी अधिनियमित करणे आणि विधिग्राह्यीकरण आणि चालू ठेवणे) अध्यादेश, १९९७ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९७ चा महा. अध्या. ३.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही उक्त अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई